**प्रेसनोट** दिनांक २४/०४/२०२४

**कळवा पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार/४९५० माधव अर्जुन दराडे व पोउपनिरी/तुषार तानाजी पोतेकर यांना सापळा कारवाई करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी घेतले ताब्यात**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | ठाणे |
| स्टेशन डायरीनोंद **क्र.** | कळवा पोलीस स्टेशन स्टेशन डायरी नोंद क्र.७३/२०२४ वेळ २३:२२ वा. |
| लोकसेवकाचे **नाव व कार्यालय** | १) **माधव** अर्जुन दराडे, पोहवा/४९५० वय ४९ वर्षे,<br>२)पोउपनि/तुषार तानाजी पोतेकर वय ४० वर्षे,<br>दोन्ही नेमणुक– कळवा पोलीस स्टेशन. ठाणे शहर |
| मागितलेल्या लाचेची **रक्कम** | २,००,०००/–रूपये |
| तडजोडीअंती **स्वीकारलेल्या लाचेची रक्कम** | १,९०,०००/–रूपये |
| थोडक्यात **हकीकत** | यातील तक्रारदार यांचा अॅल्युमिनीयम पट्टी बनवण्याचा कारखाना वाडीवरे, नाशिक येथे आहे. त्यांनी त्यांचे कंपनीतील अॅल्युमिनीय पटट्या हा माल मुंबई येथे विक्री करीता आयशर टेम्पो क्रमांक एम एच १५ जे सी १३८२ मधून पाठवला होता.<br>सदरचा आयशर टेम्पो दिनांक १६/०४/२०२४ रोजी कळवा पोलीस ठाणे, येथील अधिकारी यांनी मालासह पकडून ठेवल्याने तक्रारदार हे त्यांचा माल सोडवण्यासाठी कळवा पो.स्टे. येथे गेले असता तेथील पोहवा दराडे यांनी तक्रारदार यांना त्यांचा माल आणि आयशर टेम्पो सोडवण्यासाठी स्वत: करीता तसेच तपास अधिकारी पोउपनि पोतेकर व वरिष्ठ पो.नि. उतेकर यांना देण्या करीता एकूण दोन लाख रुपयांची मांगणी करून, पैसे दिले नाही तर माल आणि गाडी पोलीस ठाणे येथे सडत राहील अशी धमकी दिली आणि दिनांक २४/०४/२०२४ पर्यंत दोन लाख रुपये घेवून येण्यास तक्रारदार यांना सांगीतल्याने तक्रारदार यांनी दि. २४/०४/२०२४ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे येथे तक्रार दिली. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २४/०४/२०२४ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक १) माधव अर्जुन दराडे, पोहवा/४९५० नेम. कळवा पोलीस स्टेशन वय ४९ वर्षे, यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे आणि लोकसेवक २) पोउपनि/तुषार तानाजी पोतेकर वय ४० वर्षे, नेम. कळवा पोलीस स्टेशन, यांनी त्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्यावरून लाप्रवि ठाणे यांनी सापळयाचे आयोजन करून आलोस माधव दराडे यांना तक्रारदार यांच्याकडुन कळवा पोलीस ठाणे समोरील रस्त्याच्या बाजूला मोकळया जागेत १,९०,०००/–रू. लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद दोन्ही लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. |

लाचलुचपत प्रतिंबधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका संबधी काही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा.


संपर्कपत्ता :–ला.प्र.वि. ठाणे मध्यवर्ती कारागृह समोर ठाणे पश्चिम ४००६०१

सकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई–मेल :– spacbthane @mahapolice.gov.in

ऑनलाईन तकार अॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोलफ्रि नंबर :– १०६४

दुरध्वनी कमांक :–०२२–२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉट्स अॅप नं :– ९९३०९९७७००


पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

( राजेश जागडे )

पोलीस निरीक्षक

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.